पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक २६/०१/२०२१

## *गडचिरोली पोलीस दलाचे वतीने ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न*

- **मा. पोलीस अधीक्षक श्री अंकित गोयल यांचे हस्ते पदक प्राप्त पो. अधिकारी व अंमलदारांचा सत्कार**
- **गडचिरोली पोलीस दलातील एकुण १२ अधिकारी व अंमलदार मा. राष्ट्रपती पोलीस शौर्य पदकाने (PMG) सन्मानित.**
- **४५ पोलीस अधिकारी व अंमलदार मा. पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह देवुन सन्मानित**

भारतीय गणराज्याच्या ७२ प्रजासत्ताक दिनाचा ध्वजारोहण कार्यक्रम पोलीस अधीक्षक कार्यालय गडचिरोली येथे आज दिनांक-२६ जानेवारी २०२१ रोजी सकाळी ७.४५ वा. मा. पोलीस अधीक्षक श्री. अंकित गोयल सा़ो. यांचे हस्ते पार पाडण्यात आला. यावेळी गडचिरोली पोलीस दलात कार्यरत असतांना उत्कृष्ठ व शौर्यपुर्ण कामगिरी केलेल्या १२ पोलीस अधिकारी व अंमलदारांना मा. राष्ट्रपतीचे पोलीस शौर्य पदकाने सन्मानित करण्यात आले तर उल्लेखनिय सेवा बजावलेल्या ४५ पोलीस अधिकारी व अंमलदाराना मा. पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह देवुन सन्मानित करण्यात आले.

ध्वजारोहणानंतर मा. पोलीस अधीक्षक श्री अंकित गोयल सा़ो. यांनी उपस्थितांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देवुन, पदक प्राप्त पोलीस अधिकारी व अंमदारांचे अभिनंदन केले. तसेच आपल्या शुभेच्छापर भाषणात, आपणा सर्वाना मिळालेले स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी, लोकशाही उलथवु पाहणाऱ्या शक्तीविरुध्द आपला लढा सुरु ठेवावा लागेल तसेच नक्षलवाद मिटविण्याचा संकल्प करुया असे मा.पोलीस अधीक्षक सा़ो. यांनी सांगितले.

यावेळी मा. अपर पोलीस अधीक्षक (अभियान) श्री. मनिष कलवानिया सा़ो., मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. समीर शेख सा़ो. मा.उपविभागीय पोलीस अधिकारी (अभियान) श्री. भाऊसाहेब ढोले सा़ो. तसेच पोलीस अधिकारी, अंमलदार नागरिक उपस्थित होते.





